# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### जळगांव शहर व ग्रामीण भागासाठी स्वतंत्र तहसिलदार मिळण्याबाबत

**(१) ४०३०२ (०१-०४-२०२२). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहराचा वाढता विस्तार पाहता, शहर व ग्रामीण भागासाठी स्वतंत्र तहसिलदार मिळण्याकरिता मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, तसेच तहसिल इमारत जीर्ण झाली असून नवीन इमारत बांधण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, यासंदर्भात डीएसो ऑफीस (प्रांत) पुरवठा यांनी स्वतंत्र तहसिलदार मिळावा यासाठी मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनास प्रस्ताव अप्राप्त आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी वित्त विभागाने राज्यातील तालुक्यांच्या विभाजनांच्या अनुषंगाने नव्याने निकष ठरविण्यासाठी नवीन समिती गठीत करुन त्यांच्या शिफारशी प्राप्त करुन त्यानुसार तालुका विभाजनाची कार्यवाही प्रस्तावित करणे उचित होईल या प्रमाणे अभिप्राय दिले आहेत. त्यास अनुसरुन तालुका पुनर्रचना समिती स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खाजगी सावकारी प्रकरणाची चौकशी करण्याबाबत

**(२) ४२०८८ (०९-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरगाव (ता.तुळजापूर, जि.धाराशिव) येथील शेतकऱ्याने खाजगी सावकारीस कंटाळून आत्महत्या केल्याप्रकरणी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सावकाराला दिनांक ६ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी सावकारच्या त्रासाला कंटाळून धाराशिव व लातूर जिल्ह्यातील कांही शेतकरी वर्ग आत्मक्लेशातून आत्महत्या करण्याच्या तयारीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सावकार श्री.बाळासाहेब देवकते व इतर सर्व सावकारांची चौकशी करण्यासाठी व त्याच्या त्रासापासून सुटका मिळावी म्हणून काही शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २१ ऑक्टोबर,२०२० रोजी व दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी तसेच सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी मुख्यमंत्री महोदयांनी खाजगी सावकारांची चौकशी करण्याचे आदेश सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागास आदेश देवूनही उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करणाऱ्या खाजगी सावकारांची चौकशी होवून न्याय देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कारवाई करण्याबाबत व पिडीतांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (२३-०२-२०२३) : (**१) व (२) सावरगाव (ता. तुळजापूर, जि.धाराशिव) येथील शेतकरी श्री. विठ्ठल वायकर यांनी खाजगी सावकारीस कंटाळून आत्महत्या केल्याबाबत लगतच्या नातेवाईकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन, तामलवाडी, ता. तुळजापूर यांनी दिनांक ०२.०२.२०२२ रोजी सावकार श्री. रामेश्वर कदम व इतर यांच्याविरुध्द एफ.आय.आर. क्र. ००२२/२२ दाखल केली आहे. दिनांक ०८.०२.२०२२ रोजी मा. दिवाणी न्यायालय, तुळजापूर यांच्या आदेशानुसार सदर आरोपींना न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले आहे. सध्यस्थितीत सदर प्रकरणामध्ये मा. न्यायालयासमोर सुनावणी सुरु आहे.

खाजगी सावकारच्या त्रासाला कंटाळून उस्मानाबाद जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी अवैध सावकारीबाबत दाखल केलेल्या तक्रार अर्जामध्ये आत्महत्या/आत्मदहन करण्याबाबत उल्लेख केला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने संबंधीत तालुक्याचे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अन्वये चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे. तसेच लातूर जिल्ह्यातील काही शेतकरी वर्ग आत्मक्लेशातून आत्महत्या करणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातुर यांचे कार्यालयात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) खाजगी सावकार श्री. बाळासाहेब देवकते यांचे विरुध्द काही शेतकऱ्यांनी दिनांक २१.१०.२०२० रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातुर या कार्यालयांनी श्री.बाळासाहेब देवकते यांचे विरुध्द अवैध सावकारीबाबत सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतूदीनुसार कारवाई सुरु केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विरार-डहाणू (जि.ठाणे) उपनगरीय रेल्वे मार्गाच्या चौपदरीकरणासाठी खारफुटी नष्ट करण्यात येत असल्याबाबत

**(३) ४६१६० (१७-०९-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार-डहाणू (जि.ठाणे) उपनगरीय रेल्वे मार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी सुमारे २४ हजार खार फुटीच्या झाडांची तोड करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे पर्यावरणाची अपरिमित हानी होण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने पर्यावरणाची हानी रोखण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०३-२०२३) :**(१) विरार-डहाणू रोड स्टेशन दरम्यान तिसरी व चौथी रेल्वे लाईन टाकण्यासाठी २६.५१ हे. वनजमिन वळतीकरण्याच्या प्रस्तावास केंद्र शासनाने १६.०१.२०२३ रोजी मान्यता दिली आहे. सदर कामामध्ये सुमारे २४३०२ कांदळवन आणि इतर ११३६ असे एकूण २५४३८ वृक्ष बाधित होतात.

कांदळवन वृक्षांची तोड करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाची पूर्वपरवानगी आवश्यक असते. मा. उच्च न्यायालयाच्या परवानगीनंतरच कांदळवन क्षेत्रात काम सुरू करण्यास व कांदळवन वृक्षतोड करण्याकरीता वन विभागाकडून परवानगी देण्यात येईल.

(२) व (३) प्रकल्पात बाधित होणाऱ्या वृक्षांच्या बदल्यात पर्यायी वनीकरण व Avenue Plantation अंतर्गत एकूण ६९,१५१ रोपांची लागवड करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज (जि.बीड) येथील तहसील कार्यालयात खाजगी व्यक्ती संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचे काम करत असल्याबाबत**

**(४) ४८३५२ (२२-०७-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) येथील तहसील कार्यालयात संजयगांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचे काम करण्यासाठी खाजगी व्यक्ती कार्यरत असून सदर व्यक्ती शासकीय कर्मचारी असल्याप्रमाणे या योजनेचे सर्व शासकीय अभिलेख त्याच्या ताब्यात असल्याचे दिसून येत असून सदर खाजगी व्यक्ती वयोवृद्ध व निराधारांची आर्थिक पिळवणूक करत असल्याबाबत छायाचित्र व व्हिडीओ क्लिपसह स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य व जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक १४ सप्टेंबर, २०२१ व १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार यांनी शासनाला खुलासा सादर करून खाजगी व्यक्तीवर कुठलीही कारवाई न करता त्या व्यक्तीला पाठिंबा देऊन तहसील कार्यालयात काम करत नसल्याचा अहवाल शासनाला सादर केला व उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी वरील प्रकरणी तहसीलदार यांची चौकशी करण्यासाठी नायब तहसीलदार यांची नियुक्ती केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीसाठी नियुक्त नायब तहसीलदार यांनी तहसीलदार यांचे वरिष्ठ पद असल्याने त्यांची चौकशी करणे त्यांच्या अधिकार मर्यादेत नसल्याचे उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना दिनांक ६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास कळविले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांनी वरिष्ठ अधिकाऱ्याची चौकशी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०३-२०२३) :** (१) व (२) अशा आशयाची मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांची तक्रार प्राप्त झाली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी तहसिलदार केज यांना कळविले होते. त्यानुषंगाने प्रभारी तहसिलदार तथा नायब तहसिलदार केज यांनी संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजना विभागात कोणताही खाजगी व्यक्ती काम करत नसल्याबाबतचा खुलासा उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांना सादर केला होता. दरम्यानच्या कालावधीत उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई यांना कळविले होते.
(३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) प्रस्तुत प्रकरणी नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई यांनी अहवाल सादर केला नसल्यामुळे चौकशी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी तहसिलदार, अंबाजोगाई यांच्यासह ४ अधिकारी/कर्मचारी यांचे पथक नियुक्त केले होते. त्यानुषंगाने तहसिलदार अंबाजोगाई यांनी तहसिल कार्यालय केज येथे केलेल्या तपासणीमध्ये तहसिल कार्यालय केज येथे खाजगी व्यक्ती काम करत असल्याबाबतचे मा.लोकप्रतिनिधी यांनी तक्रारीसोबत दिलेले छायाचित्र हे तहसिल कार्यालय केज येथील असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुषंगाने संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करण्याचे निदेश विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना देण्यात येत आहेत.

---

## राज्यात शासनाने गट शेती योजना राबविण्याबाबत

**(५) ४९५१८ (१७-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने गट शेती योजना राबविलेली असून सदर योजना कोणकोणत्या जिल्ह्यात राबविण्यात येत आहे तसेच ही योजना राबविताना जळगांव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ घेता आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध न झाल्याने शेतीची कामे पूर्ण करता आली नसल्यामुळे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जळगांव यांनी सन २०२२ पर्यंत पूर्ण करावी असे शेतकऱ्यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांची कामे पूर्ण झाली नाहीत अशा शेतकऱ्यांना मुदतवाढ देण्याची तेथील शेतकऱ्यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२३-०२-२०२३) :** (१) होय, राज्यात शासनाने गटशेतीस प्रोत्साहन व सबलीकरणासाठी शेतकऱ्यांच्या गट शेतीस चालना देणे ही योजना सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून सर्व जिल्ह्यामध्ये राबविली आहे. कर्जमाफी हा विषय या विभागाशी संबंधीत नाही.

(२) होय, गटशेती योजनेंतर्गत प्रकल्प मुंजर असलेल्या गटांना मार्च २०२२ पर्यंत प्रकल्पाची कामे पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्यात आली होती.

(३) होय, मार्च २०२२ अखेर मुदतवाढीच्या कालावधीतही कामे पूर्ण न झाल्याने पुन्हा मुदतवाढ द्यावी अशी मागणी काही गटांनी केली आहे.

(४) गटशेतीस मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

(५) संबंधित नाही.

---

## राज्यात नियमित परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान अद्याप न मिळाल्याबाबत

**(६) ४९६५६ (१७-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजय बनसोडे (उदगीर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून पीक कर्जाच्या नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनी रुपये ५० हजार प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा तीन वर्षापुर्वी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार अनुदान वितरित करण्याची शासनाने सुरुवात देखील केली होती, तथापि त्यासाठी जिल्हा बँकेने शासनाच्या पोर्टलवर पात्र शेतकऱ्यांच्या भरलेल्या माहितीची पडताळणी केली असता, राज्यात ७ लाख ७७ हजार कर्जदारांची माहिती चुकीची भरल्याची दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) त्याचप्रमाणे पात्र शेतकऱ्यांसंबंधीच्या माहितीमध्ये नाव एकाचे, खाते क्रमांक दुसऱ्याचा, बंद खात्याचा क्रमांक अपलोड करणे तसेच इन ऑपरेटीव्ह क्रमांक नमूद करणे इ. स्वरुपाच्या चुका पडताळणीमध्ये आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे पावणेदोन लाख शेतकरी अनुदानासाठी पात्र असताना परतफेड केलेल्या रकमेपेक्षा कमी रक्कम यादीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चुकीच्या माहितीमध्ये दुरुस्ती करुन सुधारीत माहिती दोन दिवसांत पाठवावी असे शासनाने (सहकार विभाग) जिल्हा बँकांना दिलेल्या आदेशानुसार शासनास किती बँकाकडून व केव्हा माहिती प्राप्त झाली आहे,
(६) असल्यास, याबाबत किती शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान वितरीत करण्यात आले वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०३-०३-२०२३) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) अंशत: खरे आहे
(५) दिनांक १४.०२.२०२३ ते १७.०२.२०२३ या कालावधीमध्ये एकुण ४८ बँकांमार्फत एकुण १,०९,६२४ कर्ज खात्यांची सुधारीत माहिती योजना संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्यात आली आहे.
(६) सदर योजनेच्या निकषानूसार पात्र ठरलेल्या कर्जखात्यांपैकी १४.४४ लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणिकरण पुर्ण झाले आहे. त्यापैकी १२.८३ लाख कर्जखात्यांना रु.४६८३.१६ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. उर्वरीत कर्ज खात्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**कोल्हापूर जिल्ह्यात विविध आस्थापनांवरील कामगारांची नोंदणी करण्यात आली नसल्याबाबत**

**(७) ५०१३१ (१८-०१-२०२३). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात विविध आस्थापनांवर सुमारे २ लाख कामगार काम करीत असून त्यापैकी ५० टक्के कामगारांची नोंदणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामगारांची नोंदणी न करण्यात न आल्याने हे कामगार बोनस, फंड, ग्रॅज्युएटी इत्यादी आर्थिक लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी बांधकाम कामगारांना २० हजार रुपये बोनस देण्यात यावा व ज्या कामगारांची नोंदणी झालेली नाही त्यांची त्वरीत नोंदणी करण्याबाबत तसेच इतर मागण्यांच्या संदर्भात दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास हजारो कामगारांनी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व तद्नुषंगाने उक्त कामगारांची त्वरीत नोंदणी करुन त्यांना इतर लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२९-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सहाय्यक कामगार आयुक्त, कोल्हापूर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रांतर्गत माहे जानेवारी, २०२३ अखेर एकूण ३,१२,३८७ इतक्या बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) लाल बावटा बांधकाम व्यवसाय कामगार संघटनेच्या प्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक १०.१०.२०२२ रोजीच्या मोर्चाचे नोंदीत बांधकाम कामगारांना २० हजार रुपये बोनस व इतर मागण्यांबाबतचे निवेदन सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, कोल्हापूर यांना दिनांक २९.०९.२०२२ रोजी दिले आहे.

(४) लाल बावटा बांधकाम व्यवसाय कामगार संघटनेच्या दिनांक २९.०९.२०२२ रोजीच्या निवेदनातील बांधकाम कामगारांच्या नोंदणी तसेच कामगारांना देय असलेल्या लाभाबाबतच्या मागण्यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत वेळोवेळी जिल्हा कार्यालयांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी कृषी विकास अधिकारी यांच्या अहवालानुसार खताची कृत्रिम टंचाई निर्माण करुन शेतकऱ्यांची आर्थिक लुट करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(८) ५०१९५ (१८-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी कृषी विकास अधिकारी यांच्या अहवालानुसार खतांचा साठा उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आले असतानाही प्रत्यक्षात बाजारपेठेतील दुकानात डायमोनियम फॉस्फेट (डीएपी) खताची एकही पिशवी उपलब्ध नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खताची कृत्रिम टंचाई निर्माण करुन चढत्या दराने शेतकऱ्यांना खताची विक्री करण्यात येत असून याकडे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन खताची कृत्रिम टंचाई निर्माण करुन शेतकऱ्यांची आर्थिक लुट करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२३-०२-२०२३) :** (१) (२) व (३) हे खरे नाही.

यांसदर्भात नमूद करण्यात येते की, परभणी जिल्हयाकरीता खरीप हंगाम सन २०२२ साठी एकूण १३४२५७ मे. टन खत साठा उपलब्ध झाला होता. माहे सप्टेंबर अखेर २९४३९ मे. टन साठा शिल्लक होता. तसेच डीएपी खताचे खरीप हंगाम २०२२ मध्ये १२०६० मे. टन डीएपी खताचा पुरवठा झाला असून हंगाम अखेर १८९१ मे. टन डीएपी खत साठा शिल्लक होता. जिल्हयामध्ये तालुकास्तरावरील व ग्रामीण भागातील विक्रेत्यांकडे खताचा साठा उपलब्ध होता. चढया दराने खतांची विक्री होत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तपासणी पथकामार्फत नियमितपणे खत विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये २२ खत विक्रेत्यांना सक्त ताकीद देण्यात आली असून, १५ विक्रीबंद आदेश देण्यात आलेले आहेत. १२ खत परवाने निलंबित तसेच १ पोलिस केसची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच, ग्रामीण भागातील नेटवर्क अडचणीमुळे POS मशीन व प्रत्यक्ष साठा यामध्ये तफावत दिसून येत होती. याबाबत विक्रेत्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्यानंतर तांत्रिक अडचण दूर झाल्यावर तफावत दूर झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी व हिंगोली जिल्ह्यातील खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट साध्य झाले नसल्याबाबत

**(९) ५०२०० (१८-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना १२१३ कोटी २२ लाख रुपयांचे पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिले

असताना बँकेच्या उदासीनतेमुळे केवळ ५२१ कोटी रुपयांचे कर्ज वाटप झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील तीन लाखांहून अधिक शेतकरी पीक कर्जाचे लाभार्थी असताना केवळ ८२ हजार शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वाटप करण्यात आले असून तब्बल दोन लाखांहून अधिक शेतकरी अद्यापही पीक कर्जापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच हिंगोली जिल्ह्यात खरीप हंगामासाठी ८४० कोटी रुपयांचे पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले होते, परंतु, बँकेच्या नाकर्तेपणामुळे शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्यास विलंब झाला असून त्यातही केवळ ६० टक्केच कर्जवाटप झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पीककर्ज वाटपात उदासीनता दाखवणाऱ्या व शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्यास विलंब झालेल्या बँक व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, याबाबत पीक कर्जाच्या वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या व यासंदर्भातील सद्यःस्थिती काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०३-०३-२०२३) :**(१) व (२) नाही. परभणी जिल्हयासाठी जि.म.स बँका, राष्ट्रीयकृत व व्यापारी बँका व महाराष्ट्र ग्रामीण बँकांसाठी सन २०२२-२३ या वर्षासाठी खरीप हंगामासाठी रु.१२०४.१५ कोटी पीक कर्जवाटपाचा लक्षांक होता. त्यापैकी माहे सप्टेंबर २०२२ अखेर एकुण १,०९,०२१ शेतकऱ्यांना रु.८३६.३५ कोटी पीक कर्जवाटप करण्यात आलेले आहे.
(३) व (४) नाही. हिंगोली जिल्हयासाठी जि.म.स बँका, राष्ट्रीयकृत व व्यापारी बँका व महाराष्ट्र ग्रामीण बँकांसाठी सन २०२२-२३ या वर्षासाठी खरीप हंगामासाठी रु.८४०.०० कोटी पीक कर्जवाटपाचा लक्षांक दिला होता. त्यापैकी माहे सप्टेंबर अखेर एकुण ९०,४३७ शेतकऱ्यांना रु.६०५.२६ कोटी पीक कर्जवाटप करण्यात आलेले आहे.
(लक्षांकाच्या ७२.०६%).
(५) सहकार विभागाच्या दिनांक २७ जून २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार तालुका स्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पीक कर्जवाटप आढावा समिती स्थापन करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा प्रशासनाकडुन पीक कर्जवाटप मेळावे घेऊन जास्तीत जास्त पीक कर्जवाटप करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यात नवउद्योजक शेतकऱ्यांना आर्थिक उन्नतीसाठी निधी प्राप्त झालेला असतानाही अखर्चित राहील्याबाबत

**(१०) ५०२०१ (१९-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उद्योजकतेची कास धरुन आर्थिक उन्नती साधावी यासाठी सन २०१९-२० या कालावधीत रुपये २ कोटी १० लाख ६० हजारांचा निधी प्राप्त झाला त्यापैकी रुपये ८० लाखांचा निधी अखर्चित राहील्याने कृषी क्षेत्रातील नवउद्योजक शासकीय योजनेपासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी विहीत मुदतीत खर्च न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नवउद्योजकांना शासकीय योजनेपासून वंचित ठेवण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१०-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील भूविकास बँकेचे कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली नसल्याबाबत

**(११) ५०२६० (१९-०१-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूविकास बँकेचे कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांची कर्जमाफी देण्याचा निर्णय शासनाने माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार सातारा जिल्ह्यातील २० पाणीपुरवठा संस्थांमध्ये १,७०७ शेतकऱ्यांना या योजनेनुसार कर्जमाफी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्याप कर्जमाफी दिली नसल्यास कर्जमाफी केव्हा देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१५-०३-२०२३) :** (१) भूविकास बँकेचे कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ०९.११.२०२२ रोजी घेतला आहे.

(२) सदर निर्णयानुसार सातारा जिल्ह्यातील भूविकास बँकेने अर्थसहाय्य केलेल्या २१ पाणीपुरवठा संस्थांमधील ६००० शेतकरी सभासदांना कर्जमाफीचा लाभ होणार आहे.

(३) सदर कर्जमाफीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक ०३.०२.२०२३ रोजीच्या अ.शा. पत्रान्वये भूविकास बँकेच्या कर्जाचे बोजे कमी करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करणेबाबत सहकार आयुक्तांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील डोंगरी भाग म्हणुन घोषित करण्यात आलेल्या दुर्गम व शहरी भागात ई-पास पध्दत रद्द करुन ऑफलाईन पास मिळण्याबाबत

**(१२) ५०५४८ (१९-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मालकी क्षेत्रात जाऊन ट्रकची फोटोग्राफी करणे व ऑनलाईन पध्दतीने मालाचे मोजमाप ई-प्रणालीमध्ये ऑनलाईन समाविष्ट करुन नंतरच निर्गत वाहतूक पास लाकूड व्यवसायिकांना अदा करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात डोंगरी भाग म्हणुन घोषित करण्यात आलेल्या दुर्गम व शहरी भागत अद्याप भ्रमणध्वनी सुविधा, टॉवर उपलब्ध नसल्याने इंटरनेट चालणे अडचणीचे होत असल्याने ई-पास पध्दत रद्द करुन ऑफलाईन पास मिळावेत अशी मागणी लाकूड व्यावसायिक यांनी पालकमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०३-२०२३) :**(१) हे खरे आहे.

शेतकऱ्यांना मालकी क्षेत्रातील काष्ठ मालाच्या निर्गतीकरिता आवश्यक वाहतूक परवाना विहीत मुदतीत तसेच सुलभतेने मिळण्याच्या उद्देशाने ई-ट्रान्झीट पास प्रणाली संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे. तद्नंतर प्राप्त झालेल्या वाहतूक प्रकरणाबाबत संबंधित वृक्ष अधिकारी तथा वनक्षेत्रपाल यांचेमार्फत ऑनलाईन पध्दतीने निर्गत परवाना दिला जात आहे.

(२) सिंधुदूर्ग जिल्हयातील शेतकऱ्यांचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये निवेदन उपवनसंरक्षक, सावंतवाडी वन विभागास प्राप्त झाले होते.

(३) उप वनसंरक्षक, सावंतवाडी वन विभाग यांचे कार्यालयामार्फत ई-पास कार्यपध्दत समजून घेण्यासाठी वनरक्षक, वनपाल व वनक्षेत्रपाल यांचे दिनांक १८.८.२०२२ व दिनांक २४.८.२०२२ रोजी ऑनलाईन प्रशिक्षण घेतले आहे. सदर प्रणालीवर एकूण १४५७ इतके ई-पास वितरीत करण्यात आलेली आहेत. तद्नंतर आज पर्यंत उप वनसंरक्षक, सावंतवाडी वन विभाग यांचेकडे सिंधुदुर्ग जिल्हयातील शेतकरी तसेच लाकूड व्यावसायीक यांचेकडून ई-पास संदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तळेगाव (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथे कीटकनाशकांचा बनावट साठा जप्त करण्यात आल्याबाबत

**(१३) ५०८६५ (१९-०१-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथे बनावट कीटकनाशकांचा मोठा साठा जप्त करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उपरोक्त बनावट कीटकनाशकांच्या उत्पादनास प्रतिबंध घालण्यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२३-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाशिक जिल्हयातील दिंडोरी तालुक्यातील तळेगाव येथे मे. नंदिनी किचन ॲप्लेकेशन प्रा. लि. येथे छापा टाकून एकूण २९४.५० किलो/ लि. इतका, रु.६,१०,३००/-रक्कमेचा बनावट किटकनाशकांचा साठा जप्त करुन सदर गुन्हयास जबाबदार व्यक्तीविरुध्द किटकनाशक कायदा १९६८ नुसार, दिंडोरी पोलीस स्टेशन येथे फिर्याद क्र. ३४६/२०२२, दिनांक १२/१०/२०२२ रोजी दाखल केली आहे. तसेच, शेतकऱ्यांनी परवानाधारक कृषि निविष्ठा वितरकाकडूनच किटकनाशकांची खरेदी करावे, असे आवाहन वृत्तसेवा मार्फत देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यात कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) ५१००७ (१९-०१-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यात कृषी विभागातील ४१६ पदे रिक्त असल्याने शेतीपूरक योजना शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यात अडचण निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील पाच वर्षांमध्ये निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा कामाचा भार तेथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर येत असल्याने शेतकऱ्यांना वारंवार कृषी कार्यालयात जावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शेतकऱ्यांना शेतीपूरक योजनेचा लाभ मिळण्यास होत असलेला विलंब दूर करण्याच्या दृष्टीने विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२४-०२-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, रत्नागिरी कार्यालयाच्या अधिनस्त ७८८ मंजूर पदांपैकी ३७३ पदे भरलेली असून ४१५ पदे रिक्त आहेत. त्यामध्ये तांत्रिक संवर्गाची ५१३ पदे मंजूर असून ३१० पदे भरलेली व २०३ पदे रिक्त आहेत.

शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध शासकीय योजना कृषि सेवेतील (तांत्रिक संवर्गातील) अधिकारी/कर्मचारी (तालुका कृषि अधिकारी, मंडल कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक आणि कृषि सहाय्यक) यांचेमार्फत राबविण्यात येतात. उक्त रिक्त

असणाऱ्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे देवून कृषि विभागाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्यात येत आहे.
(३) महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील कृषि अधिकारी/मंडल कृषि अधिकारी या पदांवर दिनांक १८.११.२०२२ च्या आदेशान्वये पदोन्नतीने १४ अधिकाऱ्यांना रत्नागिरी जिल्ह्यात पदस्थापना दिलेली आहे.

तसेच महाराष्ट्र कृषि सेवा संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरीता कृषि सेवा परीक्षा-२०२१ करिता एकूण २०३ आणि कृषि सेवा परीक्षा २०२२ करीता २१४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे. सदर पदांकरिता उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यातील उर्वरित रिक्त पदे प्राथम्यक्रमाने भरण्यात येणार आहेत.

वित्त विभाग, शा.नि., दिनांक ३१.१०.२०२२ अन्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही, अशा विभागांना गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील (वाहनचालक आणि गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. कृषि विभागाचा सुधारीत आकृतीबंध अंतिम झालेला नसल्यामुळे या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कृषि विभागातील सरळसेवेच्या कोट्यातील उर्वरीत रिक्त पदांची भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे. कृषि सहाय्यक संवर्गामधून मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे कृषि पर्यवेक्षकांची ३० टक्के पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर व विभागीयस्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड येथे स्वतंत्र महसूल विभागीय आयुक्त कार्यालय करण्यासंदर्भातील प्रस्तावाबाबत**

**(१५) ५१०३२ (२५-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या एकूण ८ जिल्ह्यांपैकी नांदेड, परभणी व हिंगोली या जिल्ह्यांकरीता तेथील विभागीय आयुक्त कार्यालय गैरसोयीचे होत असल्याने स्वतंत्र महसूल विभागीय आयुक्त कार्यालय करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने उपरोक्त जिल्ह्यांमधील नागरिकांच्या सोयीसुविधांच्या दृष्टीकोनातून नांदेड येथे विभागीय आयुक्त कार्यालय स्थापन करण्याची विनंती शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नांदेड येथे विभागीय आयुक्त कार्यालय स्थापन करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०३-२०२३) :**१), २) व ३) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबादचे विभाजन करुन नव्याने निर्माण करावयाच्या विभागीय आयुक्तालयात कोणत्या जिल्ह्यांचा समावेश करावा व नवीन विभागीय आयुक्तालयाचे मुख्यालय कोणत्या ठिकाणी असावे या विषयी सखोल अभ्यास करुन तत्संबंधी शिफारशी करण्यासाठी दिनांक १६/०२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय अभ्यास गट गठीत करण्यात आला होता. सदर अभ्यास गटाचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उंदरी (ता.केज, जि.बीड) येथे सेवा सहकारी संस्थेच्या सभासद यादीमध्ये फेरबदल केल्याबाबत

**(१६) ५११०० (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंदरी (ता.केज, जि.बीड) येथे सेवा सहकारी सोसायटी मागील अनेक वर्षांपासून कार्यरत असून सदर वर्ग 'ड' संस्था आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेचे कागदपत्र म्हणजे सभासद यादी रोजमेळे, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद याची योग्य पध्दतीने मागील वर्षात नोंदणी झाली नसून दर वेळेस विशिष्ट पदाधिकारी निवडून यावेत म्हणून संबंधित सभासदाच्या यादीमध्ये अवैध मार्गाने फेरबदल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संस्थेचे सचिव यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २००६ रोजी व सन २००८ ते २०१३ या कालावधीसाठीची घोषीत केलेली यादी एकूण सभासद ५५९ व बिगर कर्जदारांची यादी १४० दर्शविते, परंतु पाच वर्षांच्या कालावधीमध्ये सभासद ३६५ तर सन २०२२ ते २०२७ या कालावधीची यादी सभासद संख्या ६२६ दर्शविते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सभासदाच्या यादीमध्ये फेरबदल करुन संस्थेचे सचिव विशिष्ट लोकांना सेवा सं.चे संचालक निवडून येण्यास गैर मार्गाने मदत म्हणुन संस्थेचे सर्व मुळ कागदपत्र महा स.सं.अधि ११ व कलम ८९/अ प्रमाणे तपासुन योग्य व पात्र सभासद कायमचे नावे घोषीत करुन संस्थेच्या गैरकारभाराबाबत चौकशी करुन सह. संस्थेच्या लेखा परिक्षणाचे अहवाल पाहिल्यानंतर गंभीर स्वरुपाचे फेरदबल सचिव यांनी संस्थेचा व संस्थेच्या निधीचा गैरफायदा घेण्याच्या वाईट उद्देशाने केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात रितसर कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी संस्थेचे सभासद श्री.बाळासाहेब श्रीधर ठोंबरे व २० सभासदांनी निवेदनाद्वारे जिल्हा उपनिबंधक, बीड, सहायक उपनिबंधक, केज यांच्याकडे केली असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याप्रकरणी चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबतची मागणी प्रधान सचिव, सहकार, मुंबई यांच्याकडे दिनांक २१ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चोकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१५-०३-२०२३) :** (१) नाही.

सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या कालावधीमध्ये संस्थेस लेखापरिक्षण वर्ग "क" देण्यात आलेला आहे.

(२) नाही.

संस्थेचे प्रत्येक वर्षी लेखापरीक्षण झालेले असून सन २००५ ते सन २०२२ या कालावधीतील लेखापरीक्षण अहवालामध्ये गैरव्यवहाराबाबतचे विशेष अहवाल झालेले नाहीत.

(३) नाही.

संस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक सन २००७-०८ ते सन २०१२-१३ च्या मतदार यादीमध्ये ६६९ सभासदांचा समावेश असल्याचे तसेच सन २०१४-१५ ते सन २०१९-२० च्या अंतिम मतदार यादीमध्ये एकूण ६३५ पात्र मतदारांचा समावेश असल्याचे दिसून येते. तसेच संस्थेच्या संचालक मंडळाची सन २०२२ च्या पंचवार्षिक निवडणूकीकरीता ६२६ पात्र सभासदांची अंतिम मतदार यादी दिनांक २६/०४/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) नाही.

(५) व (६) होय, श्री.बाळासाहेब श्रीधर ठोंबरे व इतर १९ सभासदांनी संस्थेच्या सभासद यादीमध्ये मनमानी पध्दतीने बदल केलेबाबत व संस्थेच्या कामकाजाबाबतचा दिनांक २०/०७/२०२२ रोजीचा तक्रार अर्ज सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. केज, जि. बीड यांना दिला होता. याच विषयाबाबत मा. आ. सौ. नमिता अक्षय मुंदडा, विधानसभा सदस्य यांनी त्वरीत चौकशी करुन कार्यवाही करणेबाबत दिनांक २१/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली होती. सदर

अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने संस्थेचे सन २०२१-२२ चे चाचणी लेखापरिक्षण करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी दिनांक ०३/०१/२०२३ रोजी दिली आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्यादित (अवसायन) या संस्थेची जागा नगरपालिका, बुलढाणा यांना हस्तांतरीत करण्याबाबत**

**(१७) ५११९४ (२७-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्यादित बुलढाणा (अवसायन) या संस्थेची जागा छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक सभागृहाकरिता नगरपालिका, बुलढाणा यांना हस्तांतरीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीनुसार शासनाने कोणता निर्णय घेतला व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२३-०२-२०२३) :** (१) होय.
बुलढाणा जिल्ह्यातील सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्यादित बुलढाणा (अवसायन) या संस्थेची जागा छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक सभागृहकरिता नगरपालिका, बुलढाणा यांना हस्तांरीत करण्याबाबत मा. श्री. संजय रामभाऊ गायकवाड वि.स.स यांनी दिनांक २२.०८.२०२२ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली आहे.
(२) शासनाने शिखर भूविकास बँक, मुंबई व जिल्हा भूविकास बँकांबाबत दिनांक ०९.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्यानुसार भूविकास बँकांच्या ४० मालमत्ता सहकार विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये जिल्हा भूविकास बँक, बुलढाणा या बँकेच्या बुलढाणा शहरातील मालमत्तेचा समावेश आहे. त्यानुषंगाने हस्तांतरणाची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळामध्ये अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(१८) ५१२७८ (१९-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळामध्ये अनेक महत्वाची पदे रिक्त असल्याने या महामंडळाच्या कामकाजावर विपरित परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे काही दिवसात होणाऱ्या मेगा भरतीत महाबीजच्या रिक्त पदांचा समावेश करण्याची शासनाने माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या उक्त घोषणेनुसार महामंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२४-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.

(३) महामंडळातील कामकाजाच्या आवश्यकतेनुसार रिक्त पदांच्या भरती बाबतची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्याच्या वन विभागात उपसंरक्षकांच्या ८५ जागा रिक्त असल्याबाबत

**(१९) ५१२७९ (१९-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या वन विभागात मंजूर १०८ पैकी उपवनसंरक्षकांच्या ८५ जागा रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे एका उपवनसंरक्षणाकडे तीन ते चार जिल्ह्याचा कारभार असल्यामुळे वन विभागात समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही, वन विभागात दिनांक १२.०८.२०१६ रोजीच्या केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार उपवनसंरक्षकांची ७२ पदे मंजूर असून त्यापैकी सप्टेंबर २०२२ मध्ये १० पदे रिक्त आहेत.
(२) व (३) हे खरे नाही. उपवनसंरक्षक या संवर्गातील सरळसेवेतील पदे केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन मंत्रालयामार्फत थेट भरण्यात येतात. त्याचप्रमाणे महाराष्ट्र वन सेवेतुन भारतीय वन सेवेत उपवनसंरक्षक पदावर पदोन्नती देण्याबाबत विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### माडग्याळ (जि.सांगली) येथील कडधान्य कृषी उत्पादनाला जीआय मानाकंन देण्याबाबत

**(२०) ५१५२२ (२३-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माडग्याळ (जि.सांगली) येथील कडधान्य, फळपिके, केळी, बोरे यांचे मोठ्या प्रमाणात पिकांचे उत्पादन राज्यभर प्रसिध्द आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील पिकांचे देशभर विक्री करण्यासाठी जीआय मानांकन देण्याबाबत स्थानिक व्यापारांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी आढावा घेऊन पिकांना जीआय मानांकन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२२-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) कृषि विभाग आत्मा अंतर्गत माडग्याळ मटकी उत्पादक शेतकऱ्यांना गट स्थापन करून नोंदणी करणेकरीता सर्वेक्षण करण्यात आले आहे. जीआय मानांकन नोंदणीसाठी लागणारी कागदपत्रांची पूर्तता करून घेण्याची कार्यवाही सूरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयासाठी नवीन इमारत उभारण्याबाबत

**(२१) ५१९५४ (२७-०१-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे १९३४ मध्ये उभारलेली जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत जीर्ण झाली असून दिवसेदिवस कार्यालयाचा व्याप वाढल्याने सदर इमारत अपुरी पडत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या कार्यालयातील काही विभाग जागेअभावी भाडे तत्वावर इतर ठिकाणी हलविण्यात आले असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालायात येणाऱ्या लोकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन येथे जिल्हाधिकारी कार्यालयासाठी नवीन इमारत उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०३-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) नागपूर येथे विभागीय आयुक्त कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय तसेच इतर शासकीय कार्यालयाच्या इमारतीचे एकत्रित बांधकामाकरीता रुपये २७१.३४ कोटी इतक्या रकमेस महसूल विभाग, शासन निर्णय, दिनांक ०२/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### केज (जि. बीड) येथील सर्वे.नं. ३०/१, ३०/२ ह्या मूळ शासकीय जमिनीचे नियमबाह्य वाटप केल्याबाबत

**(२२) ५२०७४ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) येथील सर्वे.नं. ३०/१, ३०/२ ही मूळ शासकीय जमीन आहे, परंतु सदर जमीन ही शेती प्रयोजनासाठी जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ०२ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागसवर्गीय यांचे अतिक्रमण नियमानुकूल करून प्रत्येकी ०२ हेक्टर शासकीय गायरान जमीन देण्याचे आदेश पारित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेश पारित करत असताना तत्कालीन जिल्हाधिकारी, बीड यांनी वरील सर्व अतिक्रमण धारक हे भूमिहीन असल्याबाबतची पडताळणी केली नसून अतिक्रमण नियमानुकूल करण्यापूर्वी वरील लोकांच्या नावे येथे सर्वे.नं. ७८ मध्ये ००.३८.६२ आर मालकीचे क्षेत्र होते त्यामुळे त्यांना शासकीय जमीनीचे नियमबाह्य वाटप करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेश रद्द करून नियमानुकूल केलेली जमीन शासनास जमा करून, श्री, श्रीमंत गोपीनाथ लांडगे, श्री. भानुदास शंकर लांडगे (मयत) व श्री. ज्ञानोबा रघुनाथ लांडगे यांच्या संगनमताने पूर्वनियोजित कट कारस्थान करून शासनाची फसवणूक व विश्वासघात केल्याने त्यांच्या विरोधात ठोस स्वरूपाचा गुन्हा दाखल करून कायदेशीर कार्यवाही करण्याबाबतची मागणी संपूर्ण कागदपत्री पुराव्यासह श्री. कपिल अंबादास मस्के, रा. केज यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य, विभागीय आयुक्त, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी, बीड यांच्या दिनांक ०२.०७.२०१५ रोजीच्या आदेशान्वये अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या ३ अतिक्रमण धारकांनी जमीन खरेदी केली होती. तथापि, फेरफार नोंदी सदर आदेशानंतर घेण्यात आल्याचे अभिलेख्यावरुन दिसून येते.
(३) व (४) हे खरे आहे.
(५) सदर प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र.१०३३१/२०२२ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक १३.१०.२०२२ रोजीच्या निर्णयाव्दारे जिल्हाधिकारी, बीड यांना प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, बीड यांचे कार्यालयामार्फत दिनांक २८.०२.२०२३ रोजी अंतिम सुनावणी झाली असून प्रकरणी आदेश पारित करण्याची कार्यवाही अंतीम टप्प्यात आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सडक-अर्जुनी (ता.परसोडी-सडक, जि.गोंदिया) येथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या हजेरी पत्रकावर वयोवृध्दांची बोगस नावे मजूरीची केलेली उचल

**(२३) ५२११६ (२३-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सडक-अर्जुनी (ता.परसोडी-सडक, जि.गोंदिया) येथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामाच्या हजेरीपत्रकावर गावातील विद्यार्थी व वयोवृध्दांची नावे दाखवून त्यांच्या नावावर मजूरीची उचल करण्यात आल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२०-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी गट विकास अधिकारी,पंचायत समिती सडक/अर्जुनी यांनी केलेली आहे. चौकशी मध्ये संबंधित कामे नियमानुसार करण्यात आलेली आहेत. त्यात कुणीही दोषी आढळून आले नाहीत. यास्तव कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी संशोधन सिंचन व बाजार केंद्र सुरु करुन सुरक्षित अन्न योजनेचा लाभ देण्याबाबत

**(२४) ५२२७४ (२७-०१-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दीड कोटी शेतकऱ्यांपैकी पाच लाख शेतकऱ्यांना कृषी विकास कार्यक्रमांतर्गत भरडधान्य व कडधान्य बियाण्यांच्या पाकिटांचे वितरण माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषि विभागांतर्गत शेतकऱ्यांना पोषणयुक्त सुरक्षित अन्न योजनेंतर्गत निकृष्ट दर्जाच्या बियाणांच्या पाकिटांचे वाटप करुन फसवणूक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी संशोधन सिंचन व बाजार केंद्र सुरु करुन शेतकऱ्यांना कृषी विभागांतर्गत पोषणयुक्त सुरक्षित अन्न योजनेचा लाभ देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही, भरडधान्य व कडधान्य बियाणांच्या पाकीटांचे वितरण करण्यात आले नाही.

आत्मा योजनेंतर्गत राज्यात ५.०० लाख भाजीपाला बियाणे किट वाटपाचे नियोजन करण्यात आले. महाबीज मार्फत जिल्हास्तरावर एकूण ४७४६२४ बियाणे किटचे वाटप करण्यात आले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने परराज्यात शिक्षण घेणा-या राज्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय रद्द केल्याबाबत**

**(२५) ५२४११ (२५-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने परराज्यात शिक्षण घेणा-या राज्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय तत्कालीन शासनाने रद्द केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे परराज्यात व्यावसायिक शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या व्हीजेएनटी, एसव्हीसी, आणि ओबिसी विद्यार्थ्यांना अडचण निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने फेरनिर्णय घेवून सदर योजना पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२३-०३-२०२३) :** (१), (२) व (३), महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणारे विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थी जे राज्याबाहेर परराज्यात खाजगी विनाअनुदानित व कायम अनुदानित व्यावसायिक अभ्यास क्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०१७-१८ पासून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी प्रतीपूर्ती, निर्वाहभत्ता प्रदाने इ. विद्यार्थ्याच्या आधारसंलग्न बँक खात्यावर ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास दिनांक २५.०३.२०२२ च्या शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आली.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार भारत सरकार द्वारे मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्यात येते मात्र फ्रिशीप देण्यात येत नाही. सबब, दिनांक २५.३.२०२२ रोजी जरी शासन निर्णय निर्गमित केला असला तरी कोणत्याही विद्यार्थ्यास फ्री शीप चा लाभ देण्यात आलेला नसल्याने सदर परिपत्रकास दिनांक ०२.०८.२०२२ च्या शासन परिपत्रकान्वये स्थगिती देण्यात आली.

महाराष्ट्र राज्यात सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व फ्रिशीप ऑनलाईन पध्दतीने प्रदान केली जाते. महाराष्ट्र राज्यातील परराज्यात भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती ऑफलाईन देणेबाबत दिनांक २५.०३.२०२२ व दिनांक २.०८.२०२२ रोजीच्या दोन्ही शासन परिपत्रकामध्ये स्पष्टता नव्हती . सबब दिनांक १२.०९.२०२२ च्या शासन परिपत्रकान्वये उपरोक्त दोन्ही परिपत्रके रद्द करण्यात आली. तसेच सामाजिक न्याय विभागाचे प्रस्तावित धोरण व केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या व परराज्यात

शासनमान्य व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गतील विद्यार्थ्यांना सन २०१७-१८ पासून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास दिनांक १२.०९.२०२२ च्या परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी अमृत संस्था कार्यन्वित करण्याबाबत

**(२६) ५२९०० (१८-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्राम्हण समाजासह खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या शैक्षणिक कल्याणासाठी व आर्थिक विकासासाठी तीन वर्षांपूर्वी अमृत (अॅकॅडमी ऑफ महाराष्ट्र रिसर्च, अपलिफ्टिंग अँड ट्रेनिंग) नावाची संस्था शासनातर्फे सुरू करण्यात आल्याची घोषणा तत्कालिन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यकाळात केली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्याने अमृत म्हणजे महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी या संस्थेचे कार्यालय सुद्धा सुरू केले नाही तसेच त्याकरिता लागणाऱ्या पदांची भरती केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील तरुणांच्या सर्वांगीण विकासासाठी अमृत संस्थेमार्फत पदांची भरती करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२३-०३-२०२३) : (**१) होय, हे खरेआहे,
खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील युवकयुवतींना व इतर उमेदवाराकरीता उपक्रम राबवून त्यांचा विकास घडवण्यासाठी दिनांक २२/८/२०१९ च्या शासन निर्णयान्वयये महाराष्ट्र उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्था स्थापन करण्यात आली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

अमृत संस्थेचे कार्यालय वर्ल्ड ट्रेड, मुंबई येथे भाडेत्तवावर जागा घेऊन सुरु करण्यात आले होते. तथापि, मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक ३ ऑगस्ट २०२२ च्या बैठकीत अमृत या संस्थेचे मुख्यालय पुणे येथे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याने मुंबई येथील कार्यालय बंद करुन साखर संकुल, पुणे येथे तात्पुरत्या स्वरुपात कार्यालय सुरू करण्यात आले आहे.

अमृतसंस्थेकरिताएकुण २० पदांच्या (३ नियमीत + १७ बाह्यस्त्रोताद्वारे) आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार अमृतसंस्थेचे व्यवस्थापकीय संचालक हे पद दिनांक ३०.८.२०२२ च्या आदेशान्वये भरण्यात आले असून उर्वरित पदांची भरती करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजुरा (जि.चंद्रपूर) येथे उप-विभागात संयुक्त वन व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आल्याबाबत

**(२७) ५३०१२ (२४-०१-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) येथे उप-विभागात संयुक्त वन व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शासकीय योजनेच्या कामात वन कर्मचाऱ्यांचा हस्तक्षेप असून त्यांच्याकडून मनाविरुद्ध काम करुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त समितीची कोणत्याही प्रकारची सभा न घेता गावकऱ्यांना माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन गैरव्यवहारास जबाबदार संबंधितांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०३-२०२३) :** (१) होय,
चंद्रपूर वनवृत्तातील मध्य चांदा वन विभागांतर्गत राजुरा व विरूर वनपरिक्षेत्राचा समावेश असून सदर वनपरिक्षेत्रांतर्गत ४७ गावांमध्ये संयुक्त वनव्यवस्थापन समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे नाही,
संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमध्ये शासन निर्णयानुसार वनपाल/वनरक्षक हे समितीचे सदस्य सचिव असून ते तत्परतेने कर्तव्य पार पाडत असून त्यांच्याकडून समितीच्या मनाविरुद्ध कामे करून गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) हे खरे नाही,
संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या गावामध्ये शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक त्या बैठका घेऊन कार्यवाही करून योजनांची अंमलबजावणी केली जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोजोली (ता.गोडपिंपरी, जि.चंद्रपूर) येथील एका शेतकऱ्याच्या शेतात उभे पीक नष्ट केल्यामुळे शेतकऱ्यानी आत्महत्येचा प्रयत्न केल्याबाबत

**(२८) ५३०२७ (२५-०१-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोजोली (ता.गोडपिंपरी, जि.चंद्रपूर) येथील एका शेतकऱ्याच्या शेतात उभे पीक असताना शेत वनक्षेत्रात येत असल्याचे कारण देत अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली वन विभागाने उभे पीक नष्ट केल्यामुळे शेतकऱ्याच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आल्याने श्री.गणपत सोनुले या शेतकऱ्यानी आत्महत्येचा प्रयत्न केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शेतकरी मागील चार दशकापासून सर्व्हे नंबर ५८.२ शेती कसत असताना याप्रकरणीचा दावा जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित असतानाही वन विभागाने अतिक्रमणाची जागा एका मोठ्या कंपनीसाठी अधिग्रहीत करण्याचे षडयंत्र केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन जमीनीचे प्रकरण जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रलंबित असताना शेतकऱ्याचे उभे पिक नष्ट करणाऱ्या वन विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.
मौजे गोजोली, (ता.गोडपिंपरी, जि.चंद्रपूर) येथील सर्व्हे नं. ५८/२ हा खाजगी मालकीचा असल्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे दावा प्रलंबित असण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करताना हजारो शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२९) ५३१०५ (२७-०१-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील काही वर्षात हजारो शेतकऱ्यांचे पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करताना मृत्यू झाला असून ते टाळण्याकरिता केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने ड्रोन आधारीत सेवा सुविधा केंद्राची योजना मंजूर केली होती, परंतु सदर योजना प्रत्यक्षात राबविली गेली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाकडून ड्रोन आधारीत सोई सुविधा केंद्राची स्थापना कशा प्रकारे व किती दिवसात पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२३-०३-२०२३) :** (१) व (२) केंद्र शासनाने कृषि क्षेत्रामध्ये ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्यासंदर्भात दिनांक १ जानेवारी, २०२२ व दिनांक २० एप्रिल, २०२२ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्याअनुषंगाने ड्रोन तंत्रज्ञान आधारीत प्रात्यक्षिके या बाबीमध्ये रु.६०.०० लक्ष व किसान ड्रोन आधारित सेवा सुविधा केंद्राची स्थापना या बाबीसाठी रु.२०.०० कोटी असा एकूण रु.२०.६० कोटीचा वार्षिक कृती आराखडा मान्यतेस्तव केंद्र शासनास दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी सादर केला होता. दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी केंद्र शासनाने या आराखड्यापैकी केवळ ३८ ड्रोन्स साठी एकूण रु.१.६५ कोटी निधीस मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने ड्रोन आधारित सेवा सुविधा केंद्राची स्थापना करण्यासाठी अर्थसहाय्य या घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना दिनांक २७.२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. जिल्हा निहाय लक्षांक निश्चित करून सोडतीद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. पुढील कार्यवाही मार्च २०२३ अखेर पूर्ण करण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जत (जि.सांगली) येथे शेतकऱ्यांच्या हितासाठी व सोयीसाठी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी स्थापन करण्याबाबत

**(३०) ५३१३३ (२७-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) येथे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी ह्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने आर्थिक व शेतीसंबंधीत महत्त्वपूर्ण आस्थापना असून १२३ महसुली गावांपैकी ८२ गावात सहकारी विविध कार्यकारी सोसायटी कार्यरत असून उर्वरित ४१ गावे आस्थापनेच्या सुविधेपासून वंचित व विकास सोसायटीवर अवलंबून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी भौगोलिक अंतर व आर्थिक अडचणीचा विचार करता शेतकऱ्यांच्या हितासाठी व सोयीसाठी उर्वरित ४१ गावांमध्ये विविध कार्यकारी सोसायटी स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२३-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, दिनांक २३/०९/२०१३, शासन शुध्दिपत्रक दिनांक १६/०१/२०१५ व दिनांक १४/०२/२०१७ नुसार तसेच सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार नविन विविध कार्यकारी सहकारी सोसायटी स्थापन करणेबाबतचे

निकष निधारित केलेले आहेत. सदर निकषांप्रमाणे स्वतंत्र महसुली गावामध्ये सोसायटी नोंदणीसाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखली (जि.बुलढाणा) येथील सर्व्हे नं. १०३/५ ही जमीन अकृषक न करता निवासी प्लॉट पाडून विक्री केल्याबाबत

**(३१) ५३२१७ (२९-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि.बुलढाणा) येथील सर्व्हे नं १०३/५ मूळ ७/१२ धारक यांनी मागील ३० वर्षांपूर्वी जमिन रितसर अकृषक न करता, बोगस अकृषक आदेश जोडुन निवासी प्लॉट पाडून विकल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मूळ ७/१२ धारकांनी बोगस अकृषक आदेश देवुन प्लॉट धारक रहिवाश्याच्या सुविधेकरिता असलेल्या रस्त्याची व मोकळया जागेची विक्री केल्याने सार्वजनिक सोई सुविधापासुन रहिवाशांना वंचीत ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विक्री केलेल्या प्लॉटची तलाठी दप्तरी प्लॉट धारकांच्या नावे मूळ मालकांनी नोंद घेऊ न दिल्याने ७/१२ वर मूळ मालकांचेच नाव राहिल्याने त्या आधारावर मूळ मालकांनी म्हणजेच श्री. सुभाष आप्पा विश्वंभरआप्पा बौद्रे, श्री. सुरेशआप्पा विश्वंभरआप्पा बोंद्रे, श्री. काशिनाथआप्पा विश्वंभरआप्पा बोंद्रे, यांनी विविध बँकाकडून त्या जागेवर कोट्यवधी रुपयांचे कर्ज घेऊन बँकांची फसवणुक केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून प्लॉट धारक आणि बँकांना फसविणाऱ्या दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास तहसीलदार आणि सहाय्यक निबंधक चिखली यांच्याकडे लेखी स्वरूपात केली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त दोषींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, परंतू अजूनही प्लॉट धारकांच्या नावाने नोंदी घेण्यात आल्या नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत नोंदी न घेणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) : (**१) हे खरे नाही.
मौजे चिखली भाग-१ येथील स.नं.१०३/५ एकूण क्षेत्र ४.२७.३२ हे.आर आहे.सदर सर्व्हे नंबरमध्ये भोगवटदार सुभाष विश्वंभरआप्पा बोंद्रे, सुरेश विश्वंभरआप्पा बोंद्रे, काशिनाथ विश्वंभरआप्पा बोंद्रे, अलका मलकार्जुन व विद्या राजू देशमुख यांच्या संयुक्त नावे १.५२.६० हे.आर जमीन आजरोजी ७/१२ ला आहे.सदर सं.न.१०३/५ मधील जमीन अकृषक केल्याबाबतचा कोणताही आदेश निर्गमित झालेला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) अंशतः खरे आहे.
दुय्यम निबंधक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या व ७/१२ अभिलेखाशी जुळणाऱ्या खरेदीखता नुसार सर्व्हे नं. १०३/५ मध्ये १९९ नागरीकांच्या नावाच्या नोंदी ७/१२ अभिलेखामध्ये झालेल्या असुन आज रोजी सुध्दा ७/१२ रेकॉर्डशी जुळणाऱ्या खरेदीखतांच्या नोंदी घेण्याचे काम सुरु आहे.
श्री. सुभाषआप्पा विश्वंभरआप्पा बोंद्रे, श्री. सुरेशआप्पा विश्वंभरआप्पा बोंद्रे, श्री. काशिनाथआप्पा विश्वंभरआप्पा बोंद्रे यांनी दुय्यम निबंधक कार्यालयाकडून नोंदणीकृत गहाणखत करुन दि. चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली बँकेकडून तीन कोटी रुपये कर्ज घेतलेले होते. कर्ज वितरीत करणे ही जबाबदारी सर्वस्वी संबंधीत बँकेची आहे. सुभाषआप्पा विश्वंभरआप्पा बोंद्रे व इतर यांनी बँकेचे पत्र व दुय्यम निबंधक चिखली यांचेकडील रिलीज डिड दस्त क्रमांक ३६३२,दिनांक १२.०५.२०२२ या कार्यालयाकडे सादर केल्यानुसार फेरफार क्रमांक २०८५१ नुसार सदरचे ७/१२ अभिलेखावरुन तीन कोटी रुपयांचा बोजा कमी करण्यात आला आहे.

(४) अंशतः खरे आहे.

विजय भगवान वाळेकर यांनी दिनांक ०३.०२.२०२२ रोजी तहसिलदार,चिखली जि.बुलडाणा कार्यालयास अर्ज सादर करुन मौजे चिखली येथील सर्व्हे नं. १०३/५ मधील श्री. सुभाषआप्पा विश्वंभरआप्पा बोंद्रे श्री. सुरेशआप्पा विश्वंभरआप्पा बोंद्रे, श्री. काशिनाथआप्पा विश्वंभरआप्पा बोंद्रे यांचे ७/१२ वरील विविध बाबींवर अभिप्राय देणे बाबत नमूद केले आहे.

(५) अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेश, चिखली येथे अपराध नंबर ५७८/२०२२ व अपराध नंबर ८३८/२०२२ अन्वये गुन्हा दाखल असून सद्यस्थितीत नमुद दोन्ही गुन्ह्यांबाबत पोलीस यंत्रणेमार्फत तपास सुरू आहे.

दुय्यम निबंधक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या व ७/१२ अभिलेखाशी जुळणाऱ्या खरेदीखता नुसार १९९ नागरीकांच्या नावाच्या नोंदी ७/१२ अभिलेखामध्ये झालेल्या असुन आज रोजी सुध्दा ७/१२ रेकॉर्डशी जुळणाऱ्या खरेदीखतांच्या नोंदी घेण्याचे काम सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखली (जि. बुलडाणा) येथे बनावट अकृषक आदेश जोडून जमिनीची बेकायदेशीर विक्री करून शासन व प्लॉट धारकांची फसवणूक केल्याबाबत

**(३२) ५३२२१ (२९-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री जितेंद्र सिद्धिविनायक बोन्द्रे यांनी त्यांना मिळालेल्या मुखत्यार पत्राच्या आधारे मौजे चिखली येथील सर्व्हे नं ५२ /१ मधील उपविभागीय अधिकारी यांचे रे.के.नं./ एन. ए. पी.३४ / चिखली/ २०/२०११-२०१२ दिनांक ४/ २/२०१३ अन्वये जमीन अकृषक केल्याचे दाखवून बोगस व बनावट अकृषक आदेश लावून आदेश बनावट असल्याने हस्तांतरण करण्यास प्रतिबंध केलेले असतांना प्लॉटची विक्री करून अनेकांची फसवणूक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुय्यम निबंधक चिखली यांनी उक्त भूखंडातील प्लॉटचे खरेदी विक्रीचे व्यवहार नोंदविलेले असून शेकडो वर्षांपासून त्या सर्व्हे नंबरमधून जाणारा चिखली - वळती - सवणा या वहिवाटीच्या शासकीय रस्त्यावर स्वतःची मालमत्ता समजून अतिक्रमण करून त्याची नियमबाह्यपणे विक्री केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी बनावट शासकीय कागदपत्रे तयार करणे, शासकीय वहिवाट असलेल्या रस्त्यावर अतिक्रमण करून शासकीय जमीन विकून बनावट अकृषक आदेश तयार करून शासन आणि नागरिकांची फसवणूक करणे, याबाबत तक्रारी होऊनही संबंधित अधिकारी यांच्याकडून दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत श्री. अरुण माणिकराव पाटील यांनी दिनांक १६/१२/२०१५, १८/२/२०१९, २१/१/२०२०, तसेच १४/२/२०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी बुलढाणा तथा तहसीलदार चिखली यांचेकडे दोषींवर कारवाई करण्यासंदर्भात तसेच रस्ता मोकळा करणे तथा केलेल्या नोंदी रद्द करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत नोंदी रद्द न करणे, दोषींवर कोणतीही कारवाई न करता दोषींना पाठीशी घालणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे.

मौजे चिखली भाग १ येथील स. नं. ५२/१ मध्ये श्रीमती रत्नप्रभाबाई सिध्दीविनायक बोंद्रे यांच्या नावे १.९०.१८ हे आर जमीन आहे. स. नं. ५२/१ च्या ७/१२ उताऱ्याला ईतर अधिकारामध्ये वि. उपविभागीय अधिकारी बुलढाणा यांचे आदेश क्र एनएपी.३४/चिखली/२०/२०११-१२ नुसार रत्नप्रभाबाई सिध्दीविनायक बोंद्रे यांनी ०.३२ हे आर जमीन अकृषक केल्याचे नमुद आहे.

(२) दुयम निबंधक चिखली यांचेकडे उक्त भुखंडातील प्लॉटचे खरेदी विक्रीचे व्यवहार झालेले असुन सदर चिखली- वळती- सवणा पांधण रस्त्याची हद्द कायम करणे करीता उपअधिक्षक भुमी अभिलेख, चिखली यांना मोजणी करीता पत्र देण्यात आले आहे

(३) हे खरे नाही.

मौजे चिखली ता.चिखली जिल्हा बुलढाणा येथील मोठ्या प्रमाणावर बनावट अकृषक आदेश पारित केल्याप्रकरणी अपर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सविस्तर चौकशी करण्यास्तव दिनांक २४/११/२०१५ आदेशान्वये चौकशी समितीचे गठन करण्यात आले.

समितीने चौकशीअंती १) एकुण सर्व अकृषक प्रकरणातील बनावट आदेशांचे महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५८ नुसार पुनर्विलोकन करण्याबाबत ची परवानगी देण्यात येवून सर्व अनाधिकृत अकृषक प्रकरणांचे पुनर्विलोकन करुन न्यायोचित आदेश अभिलेख दुरुस्तीची कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल सादर करणे बाबत निर्देशित केलेले आहे. २) सदर प्रकरणातील भुखंडाचे व्यवहार स्थगित ठेवणे बाबत निर्देशित केले आहे. ३) बनावट दस्तऐवजा आधारे अकृषक परवानगी प्राप्त करुन घेणारा भोगवटदार (अर्जदार) व बनावट दस्तऐवज बनविणारे व्यक्ती यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन पोलीस विभागाकडून पुढील चौकशी करण्याबाबत निर्देशित केलेले आहे.

तत्कालीन उपविभागीय अधिकारी बुलडाणा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलीस स्टेशन चिखली येथे अपराध क्रमांक ४९६/२०१६ भांदवि कलम ११९,१२०(बी) १६७ ,३३६, ४०९ ,४२०, ४६५, ४६८, ४७१,४७४ सहकलम महाराष्ट प्रादेशिक नगररचना अधिनियम ४३, २ (२) (९)(१५) गुन्हा नोंद करण्यात आला आहे. महाराष्ट जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २५८ नुसार मोजे चिखली येथील आढळुन आलेल्या एकुण ४२४ पुनर्विलोकन प्रकरणात अर्धन्यायीक स्वरुपाची कार्यवाही करण्यात येत असुन १९५ प्रकरणामध्ये आदेश पारीत करण्यात आले असुन त्यामध्ये मोजे चिखली येथील सर्व्हे नं.५२/१ मधील रत्नप्रभा सिध्दीविनायक बोंद्रे यांचे प्रकरणाचा समावेश आहे. सदर प्रकरणात अर्धन्यायीक स्वरुपाची कार्यवाही सुरु आहे

(४) हे खरे आहे.

श्री. अरुण माणिकराव पाटील यांनी दिनांक १६.१२.२०१५, १८.०२.२०१९, २१.०१.२०२० तसेच १४.०२.२०२२ रोजी दाखल केलेल्या अर्जानुसार सदरचा रस्ता मोकळा करणे करीता उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय चिखली यांचेकडुन रस्त्याची हदद कायम करणे आवश्यक असल्याने मोजणी करीता पत्र देण्यात आले. श्री. अरुण माणिकराव पाटील यांनी भुमी अभिलेख कार्यालय चिखली यांचेकडे अदयाप पावेतो मोजणी फी चा भरणा केलेला नाही. मोजणी झाल्यानंतर तात्काळ रस्ता मोकळा करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वडगावशेरी (ता.हवेली, जि. पुणे ) येथील गायरान जमिनीबाबत

**(३३) ५३२८३ (२९-०१-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगावशेरी (ता.हवेली, जि.पुणे) येथील गायरान जमीनी बाबत विचारणा केली असता अद्याप शासनाकडून माहिती दिली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, पुणे यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तीन स्मरणपत्र देऊनही अद्याप माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ ऑक्टोबर २०२२ रोजी वा त्यासुमारास महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य व अतिरिक्त मुख्य सचिव यांना यासंदर्भात निवेदन देऊनही कार्यवाही होत नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गायरान जमिनीबाबत माहिती देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०३-२०२३) : (**१), (२), (३) व (४) सन्मानीय लोकप्रतिनिधी यांना तहसिलदार, हवेली यांच्यामार्फत दिनांक १७/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मौजे वडगावशेरी, ता. हवेली, जि. पुणे येथील गायरान जमिनीसंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम जिल्ह्यात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याकरिता निती आयोगाने मंजूर केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या अनुदानात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३४) ५३६९२ (२४-०१-२०२३). श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यामधील नाविन्यपूर्ण शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतकरी बचत गटाचे उत्पन्न वाढविणे व पर्यायाने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याकरिता निती आयोगाने मंजूर केलेल्या चार कोटी ९७ लक्ष रुपये अनुदानात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी भारत सरकार, निती आयोग, नवी दिल्ली यांनी राज्याचे मुख्य सचिव, मनुकुमार श्रीवास्तव यांना पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकरी आत्महत्याग्रस्त व आकांक्षीत असलेल्या वाशिम जिल्ह्यात अनुदानात गैरव्यवहार झाल्याने याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१३-०३-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) होय. भारत सरकार, नीती आयोग, नवी दिल्ली यांचे दिनांक २०.०९.२०२२ चे पत्र मा.मुख्य सचिव यांना प्राप्त झाले आहे.
(३) विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती यांच्या अधिनस्त समितीकडून याबाबत चौकशी करण्यात आली असून त्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार योजना राबविताना गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले नाही,
परंतु यापुढे नाविण्यपुर्ण योजना राबवितांना शंभर टक्के अनुदानावर योजना न राबविता काही प्रमाणात लाभार्थी हिस्सा ठेऊन योजना राबविण्याबाबत तसेच साहित्य खरेदीबाबत शासन स्तरावरुन मान्यता घेणेबाबत किंवा जिल्हास्तरावर समिती स्थापन करणेबाबत विभागीय कृषि सहसंचालक समितीने सुचविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली तालुक्यात वडसा नवीन ब्रॉडगेज रेल्वे लाईन प्रकल्पाकरिता खाजगी जमिनीचे थेट खरेदीच्या दर पत्रानुसार भूसंपादन करण्याबाबत

**(३५) ५३९८० (२९-०१-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली तालुक्यात वडसा नवीन ब्रॉडगेज रेल्वे लाईन प्रकल्पाकरिता येथील खाजगी जमिनीची थेट खरेदीद्वारे उपविभागीय कार्यालय गडचिरोली द्वारा भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गडचिरोली यांचे कार्यालयीन पत्राद्वारा ०.०२ हेक्टर जमिनीकरिता ९ लक्ष ३० हजार रुपये मिळणार असल्याबाबत शेतकऱ्यांना दिनांक ३ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास सूचित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गडचिरोली यांचे कार्यालयीन पत्राद्वारे त्याच ०.०२ हेक्टर जमिनीकरिता ४ लक्ष ५ हजार रूपये दिनांक २२ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निर्धारित केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा प्रकारे या परिसरातील सर्वच प्रकल्पग्रस्तांना रकमेमध्ये फरक असलेली नोटीस देण्यात आल्याने प्रकल्पाग्रस्त दिनांक २२ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास दरानुसार जमीन देण्यास तयार नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रकल्पग्रस्तांना निर्धारित दरानुसार रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालयामार्फत भूधारक श्री.विलास शंकरराव बल्लमवार यांना मौजे लांजेडा येथील स.नं.२९ आराजी ०.५८ हे.आर. पैकी ०.०२ हे.आर. जमिनीकरिता रु.९,३०,०००/- इतका मोबदला निश्चित करुन दिनांक ०३/०६/२०२२ रोजीच्या नोटीसद्वारे कळविण्यात आलेले आहे.
(३) उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालयामार्फत भूधारक श्री. विलास शंकरराव बल्लमवार यांना मौजे लांजेडा येथील स.नं.२९ आराजी ०.५८ हे. आर. पैकी ०.०२ हे.आर. जमिनीकरिता रु. ४,०५,०००/- इतका मोबदला निश्चित करुन दिनांक १२/०७/२०२२ रोजीच्या नोटीसद्वारे कळविण्यात आलेले आहे.
(४) व (५) कृषी विभागातील सर्व्हे क्रमांक गावठाणमध्ये दर्शविल्याबाबत भूधारकांकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालयामार्फत सहायक संचालक, नगर रचना गडचिरोली यांचे कडुन झोनबाबत अभिप्राय प्राप्त झाल्यानुसार मुल्यांकनामध्ये बदल झाल्याने सुधारीत नोटीस देण्यात आलेली होती.उपविभागीय अधिकारी कार्यालय यांनी मोबदला रक्कम कमी किंवा जास्त केलेली नाही. नगर रचनाकार यांच्या तांत्रिक अहवालानुसार भूधारकांना सुधारीत दराप्रमाणे नोटीस निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे काही भूधारकांनी जमिनी देण्यास संमती दर्शविलेली नाही. रेल्वे अधिनियम, १९८९ (सुधारणा अधिनियम, २००८) अन्वये भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे. मांडे (ता. वाडा जि.पालघर) येथील गट क्र. १८६ या जमिनीचे मिळकत भूमिहीन शेतकऱ्यांना मिळणेबाबत**

**(३६) ५४०४३ (२९-०१-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे. मांडे (ता. वाडा, जि.पालघर) येथील (केळीचापाडा) जनार्दन गोतारणे यांना गट क्र.१८६ चे मिळकत मिळण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणातील जनार्दन गोतारणे यांच्याकडे १३३ गुंठे जमिन महसूल विभागाकडे दाखविण्यात आल्याने ते आता भूमिहीन झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन १९६७ - ६८ या कालावधी मध्ये शासनाने त्यांच्याकडून दंड आकारून महसूल विभाग म्हणून दाखविण्यात आलेल्या १३३ गुंठे जमिनीचा मोबदला मान्य करूनही शासनाने प्रत्यक्षात १० गुंठे जमीन दिल्याने या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना शासनाच्या नजर चुकीने ते भूमिहीन झाले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त जमिनीचे सर्व ७ / १२ उतारे व फेरफार तपासून त्यांना गट क्र.१८६ ची मिळकत असणारी ९० गुंठे जमीन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२०-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) मौजे मांडे, ता.वाडा, जि.पालघर येथील जुना स. नं. ९६/अ मधील क्षेत्र १-२३.० हे. आर जमीन वन विभागाकडून महसूल विभागाकडे वर्ग केलेली आहे. सदर जमिनीपैकी ०-१०.० हे. आर जमीन महसूल व वन विभागाच्या दिनांक ०३.०९.१९७० च्या ठरावानुसार तसेच तालुका हुकूम दिनांक ०४.०८.१९७१ अन्वये श्री. भिमा गंगाराम गोतारणे या भूमिहीन व्यक्तींना वाटप करण्यात आलेली आहे.

सन १९९५-९६ ते आजपर्यंतर्चे गट स्किमचे सातबारा उतारे व ९ (३) व ९(४) ची प्रत पाहता, गट नंबर १८५ क्षेत्र ०-०९.०० हे. आर या जमीन मिळकतीवर वारसाने अर्जदार यांचे नाव दाखल झाले असून आजही अर्जदार यांच्या नावाने शेतजमीन असल्यामुळे ते भूमिहीन होत नाहीत.

मौजे मांडे, ता.वाडा, जि.पालघर येथील गट नं. १८६ मध्ये सर्वे नंबर ९६/ब/१ समाविष्ठ असून फेरफार क्र. २७४, दिनांक ०१.१०.१९७१ चे अवलोकन केले असता, त्यामधील क्षेत्र कोणाही भूमिहीनांना वाटप केले नाही. सदर जमीन वन विभागाने महसूल विभागास हस्तांतरीत केलेली वन जमीन असून त्या क्षेत्राचा दर्जा "संरक्षित वन" आहे. याबाबत अपर जिल्हाधिकारी, ठाणे मुख्यालय जव्हार यांनी दिनांक १४.०६.२०१० रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना कळविले आहे.

---

**कृषी विभागातील कृषी सहाय्यकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३७) ५४०५४ (२९-०१-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व विशेषतः अचलपूर (जि.अमरावती) उपविभागातील अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, अचलपूर, धारणी, चिखलदरा येथील कृषी कार्यालयात मोठ्या प्रमाणावर अधिकारी व कर्मचारी यांची पदे रिक्त असल्यामुळे कामाचा ताण वाढल्याचे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सहायकांच्या रिक्त पदामुळे इतर कृषी सहाय्यकांवर अतिरिक्त पदभार दिला गेल्याने सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्यास मर्यादा येत असून कृषी योजनांची अमंलबजावणी होण्यास अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कृषी अधिकारी संवर्गातील ५० टक्के पदे रिक्त असल्याने केंद्र व राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या अनेक योजना राबविणे शक्य होत नसल्याने शेतकऱ्यांची गैरसोय लक्षात घेता, शासन त्वरीत कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे काय,

(४) त्याचप्रमाणे शिरुर (जि.पुणे) तालुक्यात १४ व हवेली तालुक्यात १४ पदे रिक्त आहेत, तसेच कृषी विभागाने सुधारित आकृतीबंध सादर करुन कृषी सहाय्यकांची पदे वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२४-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्हयांतर्गत उपविभागीय कृषि अधिकारी अचलपूर कार्यालय व त्यांचे अधिनस्त तालुका कृषि अधिकारी, अचलपूर,अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, धारणी व चिखलदरा या कार्यालयात एकूण ३४१ पदे मंजूर असून सद्यस्थितीत त्यापैकी १९४ पदे भरलेली व १४७ पदे रिक्त आहेत. वरील पदांमध्ये तांत्रिक संवर्गाची (कृषि सेवेतील) २२९ पदे मंजूर असून त्यापैकी १५५ पदे भरलेली आणि ७४ पदे रिक्त आहेत. यामध्ये कृषि सहाय्यकांची १६५ पदे मंजूर असून यापैकी १०९ पदे भरलेली व ५६ पदे रिक्त आहेत.

(२) शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध शासकीय योजना कृषि सेवेतील/तांत्रिक संवर्गातील अधिकारी/कर्मचारी (तालुका कृषि अधिकारी, मंडल कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक आणि कृषि सहाय्यक) यांचेमार्फत राबविण्यात येतात. विविध

शासकीय योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेली कृषि सेवेतील/तांत्रिक संवर्गातील बहुतांश पदे भरलेली आहेत. तसेच उक्त रिक्त असणाऱ्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे देवून कृषि विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र कृषि सेवा संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरीता कृषि सेवा परीक्षा-२०२१ करिता एकूण २०३ आणि कृषि सेवा परीक्षा २०२२ करीता २१४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे.

वित्त विभाग, शा.नि., दिनांक ३१.१०.२०२२ अन्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही, अशा विभागांना गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील (वाहनचालक आणि गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. कृषि विभागाचा सुधारीत आकृतीबंध अंतिम झालेला नसल्यामुळे या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कृषि विभागातील सरळसेवेच्या कोट्यातील उर्वरीत रिक्त पदांची भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे. कृषि सहाय्यक संवर्गामधून मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे कृषि पर्यवेक्षकांची ३० टक्के पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर व विभागीयस्तरावर सुरु आहे.

(४) विभागीय कृषि सहसंचालक पुणे कार्यालयाचे अधिनस्त तालुका कृषि अधिकारी, हवेली कार्यालयात कृषि सहाय्यक संवर्गाची ४९ पदे मंजूर असून त्यापैकी ४८ पदे भरलेली व १ पद रिक्त आहे. तसेच तालुका कृषि अधिकारी, शिरुर कार्यालयात कृषि सहाय्यकयांची ४९ पदे मंजूर असून त्यापैकी ३४ पदे भरलेली असून १५ पदे रिक्त आहेत.

विभागातील पदांचा आढावा घेऊन कृषि विभागाचा सुधारीत आकृतिबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सादागड व हेटी या दोन्ही गावांचा समावेश सावली तालुक्यातून मुल तालुक्यात करण्याबाबत

**(३८) ५४३०३ (२९-०१-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल (जि. चंद्रपूर) तालुक्यात सावली तालुक्यातील सादागड व हेटी ही गावे गट ग्रामपंचायत मध्ये समाविष्ट आहेत त्यामुळे या दोन्ही गावातील शेतकरी व ग्रामस्थांना तहसिल कार्यालय व पंचायत समितीमधील कामांकरिता अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे त्यांनी सादागड व हेटी या दोन्ही गावांचा समावेश सावली तालुक्यातुन मूल तालुक्यात करण्याची मागणी श्री.सतिश चौधरी सरपंच टेकाडी यांनी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर व मा. महसुल मंत्री यांना लेखी निवेदने सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०३-२०२३) :**(१) होय.

(२) होय.

(३) जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी त्यांच्या दिनांक ०९/१२/२०२२ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, मूल, जिल्हा चंद्रपूर यांना प्रस्तुत प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, मूल यांच्यास्तरावर कार्यवाही सुरू आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी तातडीने चौकशी पूर्ण करून स्वयंस्पष्ट अभिप्राय असलेला अहवाल/प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील नळदुर्ग येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याबाबत**

**(३९) ५४३५९ (२९-०१-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव (जि.उस्मानाबाद) नळदुर्ग येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याबाबत लोकप्रतिनिधिनी दिनांक २० जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुळजापूर तालुक्यात १२३ गावे व २ शहरे असून भौगोलिक क्षेत्र १४६००९ .९२ हेक्टर आहे तसेच २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २२६५२७ आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्याचे ठिकाण व तालुक्याचे केंद्र असा या शहराचा इतिहास असून नळदुर्ग स्वतंत्र तालुका करावा अशी येथील नागरिकांची मागणी आहे, यासाठी अनेक आंदोलने केली , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नळदुर्ग तालुका निर्मितीच्या अनुषंगाने योग्य ती प्रक्रिया करणे, तसेच परिसरातील जनतेच्या सुविधेच्या व मागणीच्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरूपात अप्पर तहसील कार्यालय तातडीने सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-०३-२०२३) : (**१) होय.

(२) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या दिनांक २१/०९/२०१९ च्या अहवालानुसार तुळजापूर तालुक्यात १२३ गावे, २ शहरे असून भौगोलिक क्षेत्र १४९६०७.०१ (हे.आर.) आहे. तसेच सदर तालुक्याची लोकसंख्या २७८८७९ इतकी आहे.

(३), (४) व (५) नळदुर्ग तालुका निर्मितीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत. राज्यातील तालुक्यांच्या विभाजनांच्या अनुषंगाने नव्याने निकष ठरविण्यासाठी तालुका पुनर्रचना समिती स्थापन करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे. नळदुर्ग येथे अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले असून, त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वि.का.से.सो. मध्ये कार्यरत असणाऱ्या गट सचिवांच्या**
**सेवा व वेतन विषयक अडचणी सोडविण्याबाबत**

**(४०) ५४३६५ (२९-०१-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वि.का.से.सो. मध्ये कार्यरत असणाऱ्या गट सचिवांच्या सेवा व वेतन विषयक अडचणी सोडविण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्र देवून शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार गट सचिवांच्या सेवा व वेतनाचे प्रश्न मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असून त्यांना मिळणारे वेतन हे अत्यंत अल्प असून तेही नियमित होत नसल्यामुळे त्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत सातत्याने मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-०३-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) गट सचिवांच्या सेवा व वेतनविषयक प्रश्नांबाबत मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/११/२०२२ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत गट सचिवांच्या सेवा वेतनविषयक प्रश्नांबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी शासनास शिफारस करणेसाठी समिती गठीत करण्याचे निदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सहकार आयुक्त यांनी दिनांक २८/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये डॉ. संजयकुमार भोसले, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून सदर समितीस एक महिन्यात अहवाल सादर करण्याचे निदेश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडझिरे (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील सहकारी पतसंस्थेत झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत**

**(४१) ५४४४८ (२९-०१-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडझिरे (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील अश्वमेध ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या पदाधिकारी यांनी सन २०१४ या कालावधीत १८ पैकी १५ सदस्यांना न कळविता आर्थिक गैरव्यवहाराशी दुरान्वये संबंध नसलेल्या वयोवृद्ध श्रीमती युमनाबाई चंदरान नवले यांना १५ लाख रुपये भरण्याबाबत नोटीस पाठविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी श्रीमती नवले यांनी सहकार कायदा कलम १५२ अन्वये कलम ८८ च्या चौकशीतून नाव वगळण्याकरिता सुनावणी घेण्याकरिता सहनिबंधक, नाशिक विभाग यांना दिनांक १ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास अपील अर्ज सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहनिबंधक, नाशिक यांनी श्रीमती नवले यांच्या अपील अर्जावर सुनावणी न घेता त्यांचा अर्ज नाकारुन वयोवृध्द महिलेवर अन्याय केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणातील निर्दोष सदस्यांची कलम १५२ अन्वये सुनावणी घेऊन नावे वगळण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निर्दोष सदस्यांच्या अपील अर्जावर सुनावणी घेण्याबाबत तसेच या प्रकरणातील संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१५-०३-२०२३) :** (१) अश्वमेध ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या एकूण १८ संचालक/अधिकारी यांचेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये रु. १.७६ कोटी इतक्या रक्कमेची जबाबदारी निश्चित करण्यात आली. त्यापैकी सदर संस्थेच्या संचालिका श्रीमती युमनाबाई चंद्रराव नवले यांचेवर रु. ७.७० लाख इतक्या रक्कमेची जबाबदारी निश्चित करण्यात आली. त्यानुषंगाने श्रीमती नवले यांना दिनांक १७.०२.२०२० रोजी अधिनियमाच्या कलम ९८ अन्वये मागणी नोटीस देण्यात आली.
(२) उपरोक्त कलम ८८ च्या चौकशी अहवालाविरुध्द श्रीमती नवले यांनी अधिनियमाच्या कलम १५२ अन्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचेकडे दिनांक ७ डिसेंबर, २०२० रोजी अपील अर्ज दाखल केला.
(३), (४) व (५) श्रीमती नवले यांनी सादर केलेल्या अपील अर्जामध्ये त्रुटी निदर्शनास आल्यामुळे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दिनांक १८.१२.२०२० व दिनांक २५.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांना अर्जामधील त्रुटींची दिनांक १०.०६.२०२१ रोजी पर्यंत पुर्तता करणेबाबत कळविले होते. त्यानंतर दिनांक ०६.०६.२०२२ रोजी पर्यंत अर्जदाराने अर्जामधील नमुद केलेल्या त्रुटींची पुर्तता केली नसल्याने अर्जदार यांचा अपील अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आल्याचे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दिनांक ०६.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अर्जदारास कळविले आहे.

यानंतर अर्जदाराने दिनांक २०.०७.२०२२ रोजीच्या अर्जान्वये यापुर्वी कलम १५२ अन्वये दाखल केलेल्या अपील अर्जावर कार्यवाही करण्याची विनंती केली. मात्र अर्जदारास विहीत पध्दतीने व वेळोवेळी वाजवी संधी देऊनही,

अर्जदाराने त्रुटींची पुर्तता विहीत कालावधीमध्ये न केल्याने त्यांचा अपील अर्ज दफ्तरी दाखल केल्याचे अर्जदारास दिनांक २२.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरोरा हा नवनिर्मित जिल्हा बनविण्याच्या होत असलेल्या मागणीबाबत**

**(४२) ५४८७९ (२९-०१-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील चिमुर, भद्रावती तालुके व यवतमाळ जिल्ह्यातील वणी, मारेगांव, झरी जामनी तालुके तसेच वर्धा जिल्हयातील समुद्रपूर तालुका हया सर्व तालुक्याचे एकत्रीकरणी करुन "वरोरा" हा नवनिर्मिती जिल्हा बनविण्याची मागणी मागील काही वर्षापासून करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर व वर्धा जिल्हयातील उक्त तालुके हे वरोरा शहरालगत असून दळणवळणाच्या सर्व सोयीसुविधा इथे उपलब्ध आहेत तसेच वरोरा शहरात जिल्ह्याची कार्यालये उभारण्यास व अन्य बाबीसाठी पुरेशा प्रमाणात शासकीय जमिनी व इतर सर्व सुविधा उपलब्ध असल्याने उक्त मागणीकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) राज्यातील अस्तित्वात असलेल्या जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणते निकष विचारात घ्यावे, याबाबत अभ्यास करुन शासनास निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने जिल्हा विभाजन/निर्मिती संदर्भात अहवाल शासनास सादर केला आहे.
नवीन जिल्हा निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून खर्चिक बाब आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागात बँकामध्ये ग्राहकांना व प्रामुख्याने शेतकरी ग्राहकांना बँकींग सेवा मिळत नसल्याबाबत**

**(४३) ५४८९६ (२५-०१-२०२३). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागात तालुकास्तरावर ठिकठिकाणी असलेल्या बँकामध्ये ग्राहकांना व प्रामुख्याने शेतकरी ग्राहकांना बँकींग सेवा मिळण्याबाबत अडचणी येत असल्याचे वारंवार निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बँकामध्ये अपुरा कर्मचारी वर्ग असल्याचे बँक प्रशानाकडून सांगण्यात येते तसेच ग्राहकांना रांगेत उभे रहाण्याची वेळ येवून तेथील अधिकारी व कर्मचारी वर्गाकडूनही ग्राहकांना अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी केंद्र शासनाचे वित्त मंत्रालयामार्फत उचित कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२२-०२-२०२३) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) राज्यातील ग्रामीण भागात ज्या गावामध्ये अद्याप बँकींग सुविधा उपलब्ध नाहीत त्या गावात बँकींग सेवा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही राज्यस्तरीय बँकर्स समितीमार्फत सुरु आहे.

---

### वरपगाव व लोखंडी सावरगाव (ता.अंबाजोगाई) महाराष्ट्र बँक, लोखंडी येथे नवीन पीककर्ज प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(४४) ५५१०७ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरपगाव (ता.अंबाजोगाई) येथील जवळपास १५० शेतकऱ्यांची नवीन पीककर्ज प्रकरणे महाराष्ट्र बँक, लोखंडी सावरगाव (ता.अंबाजोगाई) येथे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खरीप हंगाम संपण्याची वेळ आली तरी विभागीय कार्यालय, लातूर येथून मंजुरी न आल्यामुळे पिक कर्ज वाटू शकत नाही असे शाखाधिकारी सांगत असल्याचे शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे सदर बँकेकडून नवीन पीककर्जासाठी शेतकऱ्यांना वेठीस धरण्यात येत असून शेतकरी त्रस्त असल्यामुळे पीक कर्ज वाटप करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ व १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार किती प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली वा देण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०३-०३-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) वरपगाव (ता.अंबाजोगाई) या गावामधून बँक ऑफ महाराष्ट्रच्या लोखंडी सावरगाव या शाखेस पीककर्जाबाबत एकुण १९ अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्जापैकी २ अर्ज मंजूर झाले असुन उर्वरीत १७ अर्ज त्रुटी असल्याने नामंजूर करण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जळगाव व लासुर स्टेशन (जि.औरंगाबाद) येथे बोगस डीएपी खत विक्रेत्याला क्लीनचीट प्रकरणी गुण नियंत्रक पथकाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध कार्यवाही होण्याबाबत

**(४५) ५५१९२ (२९-०१-२०२३). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव (जि.जळगाव) येथे बोगस डीएपी खत तसेच लासुर स्टेशन (जि.औरंगाबाद) येथेही बोगस खते पोहोचविण्यात आल्याची माहिती औरंगाबाद विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाला मिळूनही लासुर स्टेशन येथील कृषी सेवा व्यावसायिकाकडे गुण नियंत्रक पथकाच्या अधिकाऱ्यांना बोगस खत मिळाले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी गुणवत्ता नियंत्रक अधिकाऱ्यांनी संबंधित कृषी सेवा व्यावसायिकाला मदत केली असून त्यामुळे शेतकऱ्यांचा रब्बी हंगाम बोगस खतामुळे संपूर्णपणे तोट्यात जाणार असल्याने या संपूर्ण प्रकरणाची तटस्थ यंत्रणेमार्फत पुन्हा चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार गुणवत्ता नियंत्रक अधिकाऱ्यांविरुद्ध व सदर कृषी सेवा व्यावसायीकांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२३-०२-२०२३) :** (१), (२), (३) हे खरे नाही.

परंतु, जळगाव जिल्ह्यात मे. स्वामी कृषी केंद्र खडकदेवळा ता. पाचोरा या विक्री केंद्रामध्ये इंडियन पोटॅश लि. या कंपनीचे एम.ओ.पी. खताचे नमुने अप्रमाणित आढळून आल्याने सदरचा साठा जप्त करुन पाचोरा पोलिस स्टेशन येथे एफआयआर क्र. ४७४/२०२२, दिनांक ०१/११/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर विक्री केंद्राचा खत परवाना कायमस्वरुपी रद्द करण्यात आला आहे.

तसेच, औरंगाबाद जिल्हयातील लासूर स्टेशन ता.गंगापूर येथे Murate of Potash असल्याचे संशयावरुन, तेथील गोदाम तपासणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये सदर खताचा साठा असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच, तपासणीवेळी सुनील एजन्सीज लासूर स्टेशन यांच्याकडे असलेल्या साठ्यामधून डीएपी खताच्या नमुन्याची तपासणी केली असता सदर नमुना प्रमाणित घोषित झाला आहे. तथापि, सदर विक्री केंद्राच्या तपासणीतील त्रुटीच्या अनुषंगाने त्यांचा परवाना निलंबित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीच्या कार्यकारी परिषदेवर स्थानिक शेतकऱ्यांनाच प्राधान्य देण्याबाबत

**(४६) ५५३८० (२९-०१-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीच्या कार्यकारी परिषदेवर प्रगतशिल तज्ञ शेतकरी म्हणून तीन जागा राखीव असून सध्या ह्या तीनही जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकण कृषी विद्यापीठ दापोली हे रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड, ठाणे, पालघर व मुंबई या कोकण विभागासाठी स्थापन करण्यात आले असून सदर विद्यापीठात प्रामुख्याने कोकण विभागातील शेती, मत्स्य शेती, फळपिके, नर्सरी इ. बाबींवर संशोधन होत असल्यामुळे कार्यकारी परिषदेवर स्थानिक प्रगतशील शेतकरी यांनाच सदस्य म्हणून नियुक्त करणे हिताचे व गरजेचे असतानाही कोकण कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर कोकण सोडून इतर विदर्भ, मराठवाडा व महाराष्ट्राच्या इतर विभागातील शेतकऱ्यांची निवड होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या कोकणात अनेक प्रगतशील शेतकरी असून ते शेतीविषयक नवनवीन संशोधन करुन शेतीमध्ये क्रांतीकारक बदल घडवत आहेत असे असतानाही कोकणातील शेतकऱ्यांना कार्यकारी परिषदेवर डावलले जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोकण कृषी विद्यापीठात प्रगतशिल शेतकरी यांच्या रिक्त असलेल्या कार्यकारी परिषदेवर कोकणातील शेतकऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०१-०३-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम ३० (१) (नऊ) मधील तरतूदीनुसार राज्यातील कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर पाच प्रगतीशील शेतकरी नेमण्याची तरतूद आहे. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर प्रगतीशील शेतकरी प्रवर्गातून दोन जागा भरण्यात आलेल्या आहेत.

(२), (३) व (४) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीच्या कार्यकारी परिषदेवर सद्यस्थितीत ३ जागा रिक्त असून सदर पदे स्थानिक प्रगतीशील शेतकऱ्यांकडून अर्ज प्राप्त झाल्यास त्याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंदगड (जि.कोल्हापूर) तालुका मध्यवर्ती ठिकाण असलेले मजरे-कार्वे या ठिकाणी अप्पर तहसिल कार्यालय मंजूर करण्याची मागणी केल्याबाबत

**(४७) ५५४४७ (२९-०१-२०२३). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यात कर्नाटक सिमेवरील सुमारे २ लाख लोकसंख्येचा डोंगरी असलेला भाग तालुका असून या तालुक्यात १६० गावे महसूली असून बरीचशी गावे महसूली गांव दर्जा पात्रतेची आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंदगड हे ठिकाण तालुक्याच्या इतर गावांपासून ६० ते ७० किलोमीटर अंतरावर असल्याने तेथील नागरीकांना प्रशासकीय कामांसाठी तालुक्याच्या ठिकाणी जाणे गैरसोयीचे होत असल्यामुळे चंदगड तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाण असलेले मजरे-कार्वे हे गांव बेळगांव व वेंगूर्ला रस्त्यावर असून त्याठिकाणी अप्पर तहसिल कार्यालय मंजूर करण्याची मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०३-२०२३) :** (१) तालुका चंदगड (जि.कोल्हापूर) हा वेंगुर्ला (महाराष्ट्र) ते बेळगाव (कर्नाटक) राज्य मार्गावरील सीमेवरील डोंगरी भाग असलेला तालुका आहे. चंदगड तालुक्यात एकूण १५५ महसूली गावे असून अन्य महसूली गावांचा दर्जा मिळणेबाबत चंदगड तहसिल कार्यालयाचे स्तरावर अद्याप कोणताही प्रस्ताव प्रलंबित नाही.
(२) होय.
(३) राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना त्यांच्या विभागाच्या नियंत्रणाखालील महानगरपालिका क्षेत्रामध्ये वाढलेली लोकसंख्या, तालुक्यातील दुरच्या भागातील जनतेस तातडीने व नजिकच्या ठिकाणी सेवा उपलब्ध व्हाव्यात तसेच सद्याच्या तहसिल कार्यालयातील कामकाजाचा वाढता व्याप या सर्व बाबींचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार स्वतंत्र अप्पर तहसिल कार्यालय निर्माण करण्याबाबत आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत सखोल तपासणी करुन स्वयंस्पष्ट व परीपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत शासनाच्या दिनांक १९.१२.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदरचे प्रस्ताव प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) येथील शेत पाणंद रस्ते खुले करणे, रस्त्यांचे मातीकाम व दबई कामासाठी निधी मंजूर करण्याबाबत

**(४८) ५५६०२ (२९-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) येथील शेत पाणंद रस्ते खुले करणे, रस्त्यांचे मातीकाम व दबई काम करण्याकरिता उपक्रम राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांसाठी शेत पाणंद रस्ते योजनेच्या धर्तीवर मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेत रस्त्यांचे मातीकाम व दबई काम करण्यासाठी रोजगार हमी योजनेचा व जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत जनसुविधा योजनेचा निधी मंजुरीचा समावेश करुन कामासाठी निधी मंजुरीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२०-०३-२०२३) : (**१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेपेक्षा अधिक शेत/पाणंद रस्त्यांच्या लांबीच्या आराखडयास मान्यता देण्यात आली आहे. औसा विधानसभा मतदारसंघातील ३८ शेत/पाणंद रस्त्यांचा एकुण ७३ कि.मी. लांबीचा आराखडा शासनाने यापूर्वीच शा.नि.दिनांक २९/०८/२०२२ अन्वये मंजुर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील तळोधी या अप्पर तहसिलदार कार्यकक्षेतून २० गावे वगळून नागभीड तहसीलदार कार्यालय कार्यकक्षेमध्ये सामाविष्ट करण्याबाबत**

**(४९) ५५७८३ (२९-०१-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्याच्या नागभीड तहसीलदार कार्यालयाचे विभाजन तळोधी (बाळापुर) या अप्पर तहसील कार्यालय निर्माण करतांना काही गावांचे अंतर प्रशासकीय सोयीचे नसल्याकारणाने पूर्ववत नागभीड तहसीलदार कार्यालयाच्या कार्यकक्षेमध्ये सामाविष्ट करण्यास विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तळोधी (बाळापुर) या अप्पर तहसीलदार कार्यालय कार्यकक्षातुन मिंडाळा, कोसंबी गवळी, किटाळी बोरमाळा या मंडळातील सुमारे २० गावांना वगळण्यासाठीचा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचा प्रस्ताव दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावांना वगळण्यासाठी अंतर व भौगोलिक संपर्कासह प्रशासकीय कारणांनी पूर्ववत नागभीड तहसीलदार कार्यालयास जोडण्यास मा. पालकमंत्री, चंद्रपूर यांनीसुद्धा दिनांक २९ मार्च,२०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आणून देण्यास पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पूर्ववत नागभीड तहसीलदारकडे उक्त गावांना जोडण्याच्या प्रस्तावास मान्यता देवून त्वरित प्रशासकीय उपाययोजना व कार्यवाही केली, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-०३-२०२३) :**(१) होय.
(२) नवनिर्मित अप्पर तहसिलदार, तळोधी (बाळापुर) च्या कार्यक्षेत्रात समाविष्ट २० गावांना पूर्ववत नागभिड तहसिलला जोडण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या दिनांक १७.११.२०१८ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला होता.
(३) होय.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडून प्राप्त दिनांक १७.११.२०१८ च्या प्रस्तावात त्रुटी आढळल्याने फेरप्रस्ताव सादर करणेबाबत विभागीय आयुक्त नागपूर यांना दिनांक ०३.०५.२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचा सुधारित प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

---

## आर्वी (ता.कारंजा, जि.वर्धा) येथील खेनवार ले-आऊट मधील मोकळ्या भूखंडाचा ७/१२ तयार करुन विक्री केल्याबाबत

**(५०) ५६४६९ (२७-०१-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (ता.कारंजा, जि.वर्धा) येथील कारंजा नगर पंचायत अंतर्गत सर्व्हे क्र.१९१/९ नविन १७३ प्लॉट क्र.७१, ७२, ७३ व ७४ क्षेत्रफळ ३५७४ चौ.फुट इतक्या मोकळ्या जागेसाठी जागा सोडण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेनवार ले-आऊट मधील प्र.क्र.१२ व १३ येथील ७/१२ तयार करुन मोकळ्या भूखंडाचा विक्री करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मोकळ्या भूखंडाचा ७/१२ उपविभागीय अधिकारी, आर्वी यांनी चौकशी करुन रद्द करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०३-२०२३) :** (१) दिनांक ०७ एप्रिल १९८४ रोजीचे तहसिलदार यांचे अकृषक आदेशानुसार मोकळया जागेसाठी जागा सोडण्यात आली होती.

(२) तत्कालिन तहसिलदार कारंजा यांचे दिनांक ०३/०७/२००७ चे आदेशानुसार खुल्या जागेवर अतिरिक्त प्लॉट ७१ ते ७४ असे ४ प्लॉट समाविष्ट करण्याबाबत आदेश पारित केल्याने प्लॉट चे ७/१२ तयार करण्यात आले. रजिस्टर दस्त क्रमांक २६१/२०१७ नुसार प्लॉट क्रमांक ७१ व रजिस्टर दस्त क्रमांक २६०/२०१७ नुसार प्लॉट क्रमांक ७२ ते ७४ विक्री करण्यात आले आहेत.

(३) वाद मिळकतीबाबत तत्कालिन तहसिलदार यांचे नवीन ७/१२ तयार करण्याचे आदेश दिनांक ०३/०७/२००७ हा उपविभागीय अधिकारी, आर्वी यांचे दिनांक ०६/०३/२०२० चे आदेशान्वये रद्द करण्यात आले आहे व फेरफार क्रमांक ४४४३ आणि ४४४४ जिल्हाधिकारी, वर्धा कार्यालयाचे आदेश दिनांक ०६/०३/२०२० नुसार रद्द करण्यात आले.

(४) प्रकरणांत तहसिलदार, कारंजा यांनी संबंधित ले-आऊट धारकांस नोटीस देऊन खुलासा मागविला आहे. सदर खुलासा प्राप्त झाल्यावर नियमोचित कार्यवाही करण्यात येईल. तसेच मंडळ अधिकारी व तलाठी यांचे बाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९७९ चे नियम ५ नुसार वेतनवाढ थांबविण्याचे आदेश पारीत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेन्द्र भोळे**
**मुंबई** **सचिव-१ (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.